RNI No. MAHBIL/2009/35827

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती

वर्ष ८ अंक ८] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी २४-मार्च २, २०२२ फाल्गुन ५-११, शके १९४३ [पृष्ठे ६, किंमत : रुपये १५.००

## प्राधिकृत प्रकाशन

## संकीर्ण सूचना व जाहिराती

### सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग, पुणे

**चौकशीची जाहीर नोटीस**

क्र./६८४७/२०२१

[ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ५० (अ)२ अन्वये]

अर्ज क्र. ६६/२०२०

श्री १००८ मुनीसुव्रतनाथ दिगंबर जैन देवस्थान बारामती, जि. पुणे

पि. टी. आर. क्र. : अे-४६६/पुणे मध्ये

शेठ रामचंद मुलुकचंद मेथा दिगंबर जैन बोर्डींग बारामती, जि. पुणे

पि. टी. आर क्र. : अे-४५१/पुणे या न्यासांच्या विलीनीकरणाबाबत.

(१) शेठ रामचंद मलुकचंद मेथा दिगंबर जैन बोर्डींग.

(२) श्री १००८ मुनीसुव्रतनाथ दिगंबर जैन देवस्थान .. अर्जदार

विरूद्ध

कोणी नाही.

ज्याअर्थी, उपरोक्त प्रकरणामध्ये मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी दिनांक ९ नोव्हेंबर २०२० रोजी आदेश केलेला आहे. त्याअर्थी सर्व संबंधितास या नोटीसीने सूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणात नमूद केलेल्या न्यासांचे विलीनीकरण करण्याबाबत मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त १, पुणे विभाग, पुणे हे आदेश करणार आहेत. तरी सदर विलीनीकरणाबाबत केलेल्या अर्जास कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस (३०) दिवसांचे आत ४५/२, कै. बा. स. ढोले पाटील रोड, वाडीया कॉलेज समोर, पुणे ४११ ००१ या पत्यावर मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त १, पुणे विभाग, पुणे यांचे

कार्यालयात समक्ष अथवा प्रतिनिधी मार्फत पाठविणे. वरील मुदतीनंतर आलेल्या हरकत अथवा कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत हरकत किंवा कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुर्ण केली जाईल व अर्जाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. हा या नोटीसीचा विषय असे.

ही नोटीस माझे सहीनिशी व सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१, पुणे विभाग, पुणे यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ रोजी दिली.

पुणे.

**रूपेश गायकवाड,**

अधीक्षक (न्यायशाखा),
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
पुणे विभाग, पुणे.

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

### अधिसूचना

क्रमांक SRA/ED/OW/2531/3C(1)/GN/2021

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ब च्या पोट-कलम (३) अनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करून दिनांक ९ एप्रिल १९९८ रोजी **राजपत्रात** प्रसिद्ध केली आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३(क) उप-कलम (१) अनुसार " झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र " घोषित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत.

त्याअर्थी, उक्त कलम ३(क) चे उप-कलम (१) मधील अधिकाराचा वापर करून मी, खालीलप्रमाणे अनुसूचीमध्ये दर्शविलेले क्षेत्र " झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र " म्हणून याद्वारे घोषित करीत आहे. सदरचे क्षेत्र बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ चे नियम ३३(१०) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजना दाखल करण्यास पात्र आहे.

### अनुसूची

मौजे माहिम विभाग, तालुका मुंबई शहर, टिपीएस क्र III

| अ. क्र. | अं.भू.क्र. | मिळकत पत्रिकेनुसार क्षेत्र (चौ.मी.) | झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून जाहीर केलेले क्षेत्र (चौ.मी.) | एकत्रित चतु:सीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पूर्वेस | पश्चिमेस | उत्तरेस | दक्षिणेस |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | ६५९ | ४१८.९० | ४१८.९० | अं.भू.क्र. ६६३ | कपडा बाजार रोड (रस्ता) | अं.भू.क्र. ६६० | डॉ. रघुवीर आत्माराम रायकर रोड (रस्ता) |
| | **एकूण ..** | **४१८.९०** | **४१८.९०** | | | | |

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
प्रशासकीय इमारत, प्रा. अनंत काणेकर मार्ग,
बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
दिनांक २० जानेवारी २०२२.

**सतिश लोखंडे,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण.

## SLUM REHABILITATION AUTHORITY

*NOTIFICATION*

No.SRA/ED/OW/2581/3C(1)/GN/2021

Whereas, the Slum Rehabilitation Authority has formed Slum Rehabilitation Scheme under the provision of section 3B (*3*) of Maharashtra Slum Area (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971 and published in *Gazette* on 9th April 1998 ;

Whereas, in view of the provision of section 3C (*1*) of the Maharashtra Slum Area (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971 the Chief Executive Officer, Slum Rehabilitation Authority is empowered to declare any area as " Slum Rehabilitation Area ".

Therefore, in view of the said provision of section 3C (*1*) of the Maharashtra Slum Area (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971. I, undersigned is hereby declare the area shown in schedule as " Slum Rehabilitation Area ". Now the said area is open to submit scheme of slum rehabilitation as per regulation 33 *(*10*)* of Development Control and Promotion Regulations, 2034 of Greater Mumbai.

*Schedule*

*Village Mahim Division, Taluka Mumbai City,TPS-III*

| Sr. No. | F. P. No. | Area as per Property Card (sq. mtr.) | Area declared as "Slum Rehabilitation Area" | Boundaries | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | East (sq.mtr.) | West | North | South |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) |
| 1 | 659 | 418.90 | 418.90 | F. P. No. 663 | Kapda Bazar Road | F. P. No. 660 | Dr. Raguveer Atamram Raikar Road. |
| | **Total ..** | **418.90** | **418.90** | | | | |

**SLUM REHABILITATION AUTHORITY,**
Administrative Building,
Prof. Anant Kanekar Marg,
Bandra (E.), Mumbai 400 051.
dated 20th January 2022.

SATISH LOKHANDE,
Chief Executive Officer,
Slum Rehabilitation Authority.

**Serial No. M-2190**

NOTICE

TATA CONSULTANCY SERVICES Ltd.

*Registered Office* : 9th floor, Nirmal Building,
Nariman Point, Mumbai 400 021.

NOTICE is hereby given that the certificate(s) for the under mentioned securities of the Company has/have been lost/mislaid and the holder (s) of the said securities/ applicant's has/have applied to the Company to issue duplicate certificate(s). Any person who has a claim in respect of the said securities should lodge such claim with the Company at its Registered Office within 15 days from this date, else the Company will proceed to issue duplicate certificate(s) without further information.

| Name(s) of holder(s) | Kind of Securities and face value | No. of Securities | Distinctive number(s) From- to |
|---|---|---|---|
| PARVATHY PUSHKAR | Equity shares of | 650 | 1971110194- 1971110518 |
| SACHIDANAND GOPIKRISHNA | Re. 1 Each | | (325 securities) |
| SHARANYA SUSHOBHITA | | | And 1957923387- 1957923711 (325 securities) |

Chennai,
19th February 2022.

PARVATHY PUSHKAR,
SACHIDANAND GOPIKRISHNA,
SHARANYA SUSHOBHITA.

## हिंगोली जिल्हा परिषद, हिंगोली

## अधिसूचना

क्रमांक जिपहिं/साप्रवि/परिषद/कावि/२१२/२०२२

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १४२ पोट-कलम (४) व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (वार्षिक प्रशासन अहवाल तयार करणे) नियम, १९६४ मधील नियम (९) अन्वये मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली याद्वारे जाहीर करतो की हिंगोली जिल्हा परिषदेच्या सन २०२०-२०२१ च्या वार्षिक प्रशासन अहवालास जिल्हा परिषदेने ठराव क्रमांक (३७०), दिनांक ८ डिसेंबर २०२१ अन्वये मंजुरी दिली असून दिनांक ८ डिसेंबर, २०२१ रोजी वार्षिक प्रशासन अहवाल प्रसिद्ध करण्यात आला आहे.

जिल्हा परिषद, हिंगोली वार्षिक प्रशासन अहवाल सन २०२०-२०२१ प्रसिद्ध करण्यात आल्याबाबतची अधिसूचना याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**संजय दैने,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, हिंगोली.

हिंगोली,
दिनांक १८ फेब्रुवारी २०२२.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.